पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B'Grade (CGPA-2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १३५ व्या नियमित बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि. २२ जानेवारी, २०२१ दुपारी २:३० वा.



व्यवस्थापन परिषदेची १३५ वी बैठक शुक्रवार, दि. २२ जानेवारी, २०२१ रोजी दुपारी ०२:३० वा. मा. कुलगुरु महोदया यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु | अध्यक्षा |
| २) | डॉ. देबेन्द्रनाथ मिश्रा - प्र-कुलगुरु | सदस्य |
| ३) | प्रा. म. म. माने | सदस्य |
| ४) | डॉ. वि. ल. कदम | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. शं. कि. पाटील | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. र. भि. भोसले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. अ. बा. शिंगाडे | सदस्य |
| ८) | प्राचार्य डॉ. सं. वि. कोटी | सदस्य |
| ९) | डॉ. ह. कृ. आवताडे | सदस्य |
| १०) | श्री. अ. कि. आवळे | सदस्य |
| ११) | डॉ. ब. पां. रोंगे | सदस्य |
| १२) | कु. अ. चं. चव्हाण | सदस्या |
| १३) | डॉ. ता. ना. कोळेकर | सदस्य |
| १४) | डॉ. श्रीमती सु. इ. शेख | सदस्या |
| १५) | डॉ. श्रीमती रा. उ. देशपांडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी) | सदस्या |
| १६) | सीए श्रेणीक शहा - प्र. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित |
| १७) | सीए श्रेणीक शहा - वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित |
| १८) | प्रा. डॉ. वि. भा. घुटे - प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव |

### स्वागत:

प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले. तसेच, मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे प्रतिनिधी म्हणून डॉ. श्रीमती रा. उ. देशपांडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे स्वागत करण्यात आले.

### अनुपस्थिती:

ॲड. श्रीमती नी. सु. मंकणी यांनी दुरध्वनीद्वारे अनुपस्थित राहण्याबाबत विनंती केली होती. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेऊन मान्यता देण्यात आली. डॉ. एस. सी. मांडे - संचालक, नॅशनल सेंटर फॉर सेल सायन्सेस, पुणे विद्यापीठ कॅम्पस, पुणे, डॉ. ध. र. माने, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, पुणे व डॉ. द. व्यं. जाधव, विभागीय सहसंचालक, (तंत्र शिक्षण), पुणे हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

विषय क्र.१ १. दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३३ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

२. दि. २६ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे व केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेणे.

ठराव : १) दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३३ व्या बैठकीतील कार्यवृत्तांतानुसार केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

२) दि. २६ नोव्हेंबर, २०२० रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १३४ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.

| |
|---|
| • पान क्र. १५ वरील विषय क्र. ५(१) मधील ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| पूर्वीचा ठराव |
| दि.१२/११/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समिती इतिवृत्तांतास खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>विषय क्र. ५ मधील ठरावामध्ये अ.क्र.५ चा समावेश करण्यात यावा.<br>अ.क्र. ५ - प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्स्लटंट (PMC) यांचे मानधन, प्रत्यक्ष कामाच्या रक्कमेच्या १.५% दराने देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| दि.१२/११/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समिती इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| • पान क्र. २३ वरील विषय क्र. ५(९) मधील ठरावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. |
| पूर्वीचा ठराव |
| विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय सहाय्यता निधी योजने अंतर्गत सुविधा देण्यासाठी विविध हॉस्पिटल्स सोबत Memorandum of Understanding (MoU) च्या मसुद्यात सुधारणा करुन, पुनश्च आगामी बैठकीत सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| दुरुस्त केलेला ठराव |
| विद्यापीठ कर्मचारी वैद्यकीय सहाय्यता निधी योजने अंतर्गत सुविधा देण्यासाठी विविध हॉस्पिटल्स सोबत Memorandum of Understanding (MoU) करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तसेच समितीने तयार केलेल्या Memorandum of Understanding (MoU) मसुद्यात सुधारणा करुन, पुनश्च आगामी बैठकीत सादर करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

विषय क्र.२ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, मा.कुलसचिव यांनी विद्यापीठाच्या प्रत्येक सहा महिन्यांचा विकास कार्यक्रमांचा एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

कुलसचिव यांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, दि. ०१ जुलै, २०२० ते दि. ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीतील विकास कार्यक्रमांचा अहवाल वाचून दाखविला असता, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १४ (६) (जे) नुसार, कुलसचिव यांनी सादर केलेल्या विद्यापीठाच्या दि.०१ जुलै, २०२० ते दि.३१ डिसेंबर, २०२० या कालावधीतील सहा महिन्यांच्या विकास कार्यक्रमांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.३ उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१७/१२/२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखड्यास मान्यता दिलेली असून, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासपाठ्यक्रम, विषय, तुकडी व विद्याशाखा आणि सॅटेलाईट केंद्र सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या शासन मान्यतेस अनुसरुन प्रस्ताव मागविणेस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१७/१२/२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखड्यास मान्यता दिलेली असून, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून नवीन महाविद्यालय, अभ्यासपाठ्यक्रम, विषय, तुकडी व विद्याशाखा आणि सॅटेलाईट केंद्र सुरु करणेकामी प्राप्त झालेल्या शासन मान्यतेस अनुसरुन प्रस्ताव मागविणेस, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.४ मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १५७३७/२०१९ वर दि.०९/०९/२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरुन सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही बाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेला शासन निर्णय क्र.: बीसीसी-२०२०/प्र.क्र २९५/१६-ब,दि.२४/११/२०२० माहितीस्तव.

मा. सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १५७३७/२०१९ वर दि.०९/०९/२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरुन, सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाहीबाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेला शासन निर्णय क्र.: बीसीसी-२०२०/प्र.क्र २९५/१६-ब,दि.२४/११/२०२० ची नोंद घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र. १५७३७/२०१९ वर दि.०९/०९/२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरुन, सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही बाबत सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेला शासन निर्णय क्र.: बीसीसी-२०२०/प्र.क्र २९५/१६-ब,दि.२४/११/२०२० ची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.५ शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक, बेंगलोर यांना पाठविण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा Annual Quality Assurance Report (AQAR) नॅक, बेंगलोर यांना पाठविण्याबाबत, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.६ प्रस्तुत विद्यापीठात खाजगी कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या इंन्स्ट्रूमेंट एक्सपर्ट, वेबसाईट डेव्हलपर, नर्स, संगणक तज्ज्ञ, जनसंपर्क अधिकारी, अंतर्गत लेखापरीक्षक, कृषि सहायक व टेक्निकल असिस्टंट या पदांकरिता माहे नोव्हेंबर, २०२० पासून एकत्रित वेतन आदा करण्याबाबत तातडीची बाब म्हणून व्यवस्थापन परिषदेच्या वतीने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : प्रस्तुत विद्यापीठात खाजगी कंत्राटदारामार्फत पुरविण्यात येणाऱ्या इंन्स्ट्रूमेंट एक्सपर्ट, वेबसाईट डेव्हलपर, नर्स, संगणक तज्ज्ञ, जनसंपर्क अधिकारी, अंतर्गत लेखापरीक्षक, कृषि सहायक व टेक्निकल असिस्टंट या पदांकरिता माहे नोव्हेंबर, २०२० पासून एकत्रित वेतन आदा करण्याबाबत तातडीची बाब म्हणून, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.७ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांसाठी कंत्राटी सहायक प्राध्यापकांची तात्पुरती पदे संबंधित संकुलातील कार्यभाराचा आढावा घेऊन निर्माण केली असून, Walk-in-Interview द्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०३ मधील तरतूदीनुसार Online Platform (Video Conferencing) द्वारे भरती प्रक्रीया पूर्ण केल्याची बाब माहितीस्तव.

सदर विषय माहितीस्तव असल्याने, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करिता विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलांसाठी कंत्राटी सहायक प्राध्यापकांची तात्पुरती पदे संबंधित संकुलातील शैक्षणिक कार्यभाराचा आढावा घेऊन आवश्यतेनुसार निर्माण केली असून, Walk-in-Interview द्वारे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १०३ मधील तरतूदीनुसार Online Platform (Video Conferencing) द्वारे भरती प्रक्रीया पूर्ण केलेल्या बाबीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.८ अंतर्गत तक्रार निवारण समितीवर दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. १५ नुसार केलेल्या अध्यक्ष/सदस्यांच्या नामनिर्देशनात मा. कुलगुरु महोदयांनी अंशत: फेरबदल केल्याची बाब विचारार्थ.

डॉ. श्रीमती एस. व्ही. राजमान्य यांनी अंतर्गत तक्रार निवारण समितीचे अध्यक्षपद स्वीकारण्यास दि.०१/१२/२०२० रोजीच्या पत्रानुसार लेखी स्वरुपात कळवून असमर्थता दर्शविल्यामुळे, मा. कुलगुरु महोदयांनी अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या रचनेत अंशत: केलेल्या बदलाची नोंद घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : अंतर्गत तक्रार निवारण समितीवर दि. ०५ नोव्हेंबर, २०२० रोजी व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. १५ नुसार केलेल्या अध्यक्ष/सदस्यांच्या नामनिर्देशनात मा. कुलगुरु महोदयांनी अंशत: केलेल्या फेरबदलास (अध्यक्ष - प्राचार्या डॉ. श्रीमती मीना गायकवाड) सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.९ इतर विद्यापीठातून प्रस्तूत विद्यापीठात संस्थातंर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांच्या चेंजेस इन स्टाफच्या मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर चेंजेस इन स्टाफ समितीने केलेल्या शिफारशीस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदयांनी मान्यता दिल्याची बाब माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच या संदर्भात सन २००६ मध्ये सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करताना शासनाद्वारे ज्या शिक्षकांना सहयोगी प्राध्यापक पदाची श्रेणी संरचनेमध्ये स्थान निश्चिती करण्यात आली आहे, अशा शिक्षकांच्या बाबत चेजेंस इन स्टाफच्या मान्यता संबंधी, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :

१) इतर विद्यापीठातून प्रस्तूत विद्यापीठात संस्थातंर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांच्या चेंजेस इन स्टाफच्या मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर चेंजेस इन स्टाफ समितीने केलेल्या शिफारशीस, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

२) सन २००६ मध्ये सहाव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती करताना शासनाद्वारे ज्या शिक्षकांना सहयोगी प्राध्यापक पदाच्या संरचनेमध्ये स्थान निश्चिती करण्यात आली आहे, अशा शिक्षकांच्या बाबत चेजेंस इन स्टाफ मान्यतेसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत प्रस्ताव विद्यापीठात सादर केल्यानंतर त्यांना, गठीत समितीद्वारे मान्यता देण्यात यावी.

विषय क्र.१० संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, दुरुस्तीसाठी आलेले तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांचे चेंजेस इन स्टाफ मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर समितीने शिफारस केलेली आहे. सदर समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

संलग्नित २३ महविद्यालयांकडून विविध विद्याशाखा अंतर्गत सहायक प्राध्यापक, संस्था अंतर्गत बदली, दुरुस्तीसाठी आलेले आणि पदोन्नती झालेल्या ९४ शिक्षकांचे चेजेंस इन स्टाफच्या मान्यतेकरिता, दि.३१/१२/२०२० रोजी संपन्न झालेल्या चेजेंस इन स्टाफ समितीच्या बैठकीतील कार्यवृत्तांतासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, प्राध्यापक व प्राचार्य या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, दुरुस्तीसाठी आलेले तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांचे चेंजेस इन स्टाफ मान्यता प्रस्तावाबाबत दि.३१/१२/२०२० रोजी झालेल्या चेजेंस इन स्टाफ समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.

विषय क्र.११ AICTE च्या नियमानुसार M.B.A. अभ्यासक्रमासाठी वाणिज्य व व्यवस्थापन संकुलाची स्वतंत्र नवीन इमारतीचा प्रस्ताव विचारार्थ.

सदर विषयासंदर्भात सविस्तर चर्चा होऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : AICTE च्या नियमानुसार M.B.A. अभ्यासक्रमासाठी वाणिज्य व व्यवस्थापन संकुला अंतर्गत व्यवस्थापन विभागासाठी स्वतंत्र नवीन इमारतीच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.१२ आरोग्य विज्ञान संकुल व श्री साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार (MoU) संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.

सदर विषयासंदर्भात तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली असून, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : आरोग्य विज्ञान संकुल व श्री साई समर्थ एज्युकेशनल मेडिकल रिसर्च सोसायटी, नागपूर यांच्याशी शैक्षणिक सहचर्य करार (MoU) संदर्भात, मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

विषय क्र.१३ दि.२२/१२/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत विचारार्थ.

दि.२२/१२/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समिती बैठकीच्या इतिवृत्तांता संदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : दि.२२/१२/२०२० रोजीच्या इमारत व बांधकाम समितीच्या इतिवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

विषय क्र.१४ **दि.०८/०१/२०२१ रोजी झालेल्या खरेदी समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत मान्यतेस्तव.**

दि.०८/०१/२०२१ रोजीच्या खरेदी समिती बैठकीच्या कार्यवृत्तांता संदर्भात, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **दि.०८/०१/२०२१ रोजीच्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**विषय क्र.१५ सन २०२०-२१ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२१-२२ च्या मुळ अर्थसंकल्पाबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ.**

सन २०२०-२१ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२१-२२ च्या मूळ अर्थसंकल्पावर वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस व मा. वित्त व लेखा अधिकारी यांनी सर्व सदस्यांच्या माहितीकरिता अर्थसंकल्पाचे वैशिष्टपूर्ण भागांबाबत विवेचन केल्यानंतर, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : **सदरचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदय यांच्या परवानगीने आयत्या वेळेचे विषय:

[१६(१)] पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. २० अन्वये मान्यता दिलेली सुधारित नियमावली फेरविचारार्थ.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने ठराव क्र. २० अन्वये मान्यता दिलेली सुधारित नियमावली फेरविचारात घेऊन, सर्वानुमते खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातून पदवी/पदव्युत्तर उत्तीर्ण स्नातकांमधून सुवर्णपदकाचा विजेता/मानकरी निश्चित करणेसाठी गुणवत्ता यादी तयार करणे व सुवर्णपदक विजेता ठरविणे तसेच सुवर्णपदक पुरस्कृत करण्यासाठी सुवर्णपदकासाठी देणगीदाराकडून प्रस्ताव स्वीकारण्याबाबतची दि.१६ जुलै, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने पारित केलेल्या ठराव क्र. २० मधील नियमावलीमध्ये खालील सुधारणा /दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| सुवर्णपदकाचा प्रस्ताव स्विकारण्याची नियमावली | |
|---|---|
| १) | देणगीदाराने सुवर्णपदकासाठी किमान रु.३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लाख फक्त) रक्कम कायमस्वरुपी विद्यापीठात ठेवणे आवश्यक आहे. |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून बैठक संपल्याचे प्र. कुलसचिव यांनी जाहीर केले.

| सही/-<br>सदस्य सचिव<br>व्यवस्थापन परिषद | सही/-<br>अध्यक्ष<br>व्यवस्थापन परिषद |
|---|---|